# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३

जा.क्र.मनपा/उद्यान / 572 /2024-25 दिनांक :-29 /11 /2024

**// जाहीर नोटीस सुचना //**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम 1975 च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या कलम 8(3) अन्वये या नोटीसव्दारे असे जाहिर करण्यात येत की मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकासकामात बाधीत होणारी झाडे मुळासहित काढणे व पुर्न:रोपण करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव | संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | भाईंदर (पू.) नवघर जुना तलाव उद्यान (मा. कार्यकारी अभियंता सा.बां.) | 29 नग नारळ<br>नग 02 आरेका पाम<br>04 नग जांभूळ<br>01 नग रॉयल पाम<br>02 नग समुद्र फुल<br>11 नग बदाम<br>22 नग पाम<br>01 नग पळस | सदरची झाडे भाईंदर (पू.), नवघर जूना तलावाच्या भिंतीचे नव्याने बांधकाम करणेकामात बाधित होत आहे. सदरच्या झाडांची उंची पाहता तसेच झाडांची मुळे तलावाच्या संरक्षक भिंतीमध्ये गेल्यामुळे सदरची झाडे काढून पुर्नरोपन करणे शक्य नाही. या कारणास्तव झाडे मुळासकट काढणे आवश्यक आहे. |
| 2 | भाईंदर (पू.) आरक्षण क्र.122 भारतरत्न सचिन तेंडुलकर मैदान (मा. कार्यकारी अभियंता सा.बां.) | 01 नग बदाम<br>06 नग पेट्रोफार्म<br>01 नग नारळ<br>01 नग वड<br>02 नग पिंपळ<br>01 नग टबोबिया रोझिया | सदरची झाडे भाईंदर (पू.), आरक्षण क्र.122, भारतरत्न सचिन तेंडूलकर मैदानातील रंगमंचच्या बाजुला व जॉगींग ट्रॅक लगत फूटबॉल टर्फ बांधकामात अडथळा निर्माण करत आहे. या कारणास्तव झाडे मुळासकट काढणे आवश्यक आहे. |
| | | 01 नग कडुलिंब<br>01 नग बेल<br>01 नग पिंपळ<br>01 नग नारळ | सदरची झाडे भाईंदर (पू.), आरक्षण क्र.122, भारतरत्न सचिन तेंडूलकर मैदानातील रंगमंचच्या बाजुला व जॉगींग ट्रॅक लगत फूटबॉल टर्फ बांधकामात अडथळा निर्माण करत आहे. सदरच्या झाडांची उंची पाहता सदरची झाडे काढुन पुर्न:रोपण करणे शक्य आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची व पुर्न:रोपण करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरीकांच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून 7 दिवसाच्या आत लेखी स्वरूपात उप-आयुक्त (उदयान), उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे व mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदती नंतर प्राप्त होणाऱ्या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही. तसेच सदरची सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळा वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

(कांचन गायकवाड)
सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with CamScanner